| | | |
|---|---|---|
| **MHNB090005072022** | दाखल दिनांक : | १९.०७.२०२२ |
| | नोंदणी दिनांक : | १९.०७.२०२२ |
| | निकाल दिनांक : | १८.०३.२०२६ |
| | कालावधी : | ०३ व. ०७ म. ३० दि. |

**<u>तळोदा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जि. नंदुरबार यांचे न्यायालयात</u>**

**(पिठासीन अधिकारी डी. डी. माने)**

**फौजदारी किरकोळ अर्ज. क्र. १५९/२०२२**

**निशाणी क्रमांक–११.**

१. सुकन्या सुदाम ठाकरे,

वय–३२ वर्षे, धंदा– घरकाम,

२. दिपराज सुदाम ठाकरे,

वय–१० वर्षे, धंदा– शिक्षण,

३. दिव्या सुदाम ठाकरे,

वय–८ वर्षे, धंदा– शिक्षण,

अर्जदार क्र. २ व ३ अज्ञान पालनकर्ता म्हणून अर्जदार क्र. १.

रा.जोशी नगर, तळोदा, ता. तळोदा जि. नंदुरबार **....अर्जदार**

**विरुध्द**

१. सुदाम नारायण ठाकरे,

वय–३८ वर्षे, धंदा– एम एस ई बी ऑपरेटर,

रा. जोशी नगर, तळोदा, ता. तळोदा, जि. नंदुरबार.

२. नारायण सुदाम ठाकरे,

वय–६३ वर्षे, धंदा–सेवानिवृत्त,

३. पार्वती नारायण ठाकरे,

वय–५५ वर्षे, धंदा– घरकाम,

४. पंकज नारायण ठाकरे,

वय–३२ वर्षे, धंदा– शेती,

सामनेवाला क्र. २ ते ४ रा – मोड, ता. तळोदा, जि. नंदुरबार **...गैरअर्जदार**

---

**महिलांचे कौटुंबीक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, २००५ च्या कलम १७, १८, १९, २० व २२ प्रमाणे..**

---

अर्जदाराचे विधीज्ञ – श्री. एस. एन. पवार.

गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांच्या विरूध्द प्रकरण एकतर्फा चालविण्यात आले.

---

**न्यायनिर्णय**

(जाहीर दिनांक १८.०३.२०२६)

अर्जदारांनी सदरचा अर्ज महिलांचे कौटुंबीक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, २००५ प्रमाणे दाखल केला आहे.

**अर्जदारांचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे –**

०२. अर्जदार क्र. ०१ ही गैरअर्जदार क्रं.१ ची लग्नाची कायदेशीर पत्नी आहे. गैरअर्जदार क्रं.२ हे अर्जदाराचे सासरे, गैरअर्जदार क्र. ३ हि अर्जदाराची सासू व गैरअर्जदार क्र. ४ हा दिर आहे. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दि. २७.०५.२०११ रोजी मोड, ता. तळोदा येथे संपन्न झाला. लग्नानंतर अर्जदार क्र. ०१

हि गैरअर्जदार क्र. १ सोबत तो नोकरी करत असलेल्या ठिकाणी म्हणजे सातारा, वळसा, सोलापूर येथे नांदावयास गेली. गैरअर्जदारांनी सुरूवातीचे काही दिवस अर्जदार क्र. ०१ हिला चांगली वागणूक दिली. त्यांना लग्न संबंधातून मुलगा दिपराज व मुलगी दिव्या जन्मास आले. गैरअर्जदार क्र. १ हा महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीमध्ये ऑपरेटर म्हणून नोकरीस आहे. सन २०१४ मध्ये त्यांची बदली तळोदा येथे झाली. त्यामुळे अर्जदारांचा गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांच्यासोबत मोड या गावी राहण्याचा प्रसंग आला. तेव्हा पासून गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे अर्जदारास शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास देत होते. ते अर्जदार क्र. १ हिला ड्रेस घालायचा नाही असे बंधन लावत असे. तसेच, अनेक प्रकारचे आरोप गैरअर्जदार हे तिच्यावर लावत असे. गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे अर्जदार क्र. १ हिला ''तु इथे कशाला आलीस तु तिकडेच बरी होती'' असे म्हणत होते. तसेच, लग्नामध्ये मनाप्रमाणे वस्तु भेटल्या नाही असे बोलून दाखवत असे. गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे गैरअर्जदार क्र. १ याला भरवून देत असे. त्यामुळे तो अर्जदार क्र. १ हिच्यासोबत भांडण करत असे. परंतु, सुखी संसाराच्या आशेने अर्जदार क्र. १ हिने सर्व सहन केले.

०३. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार हे अर्जदार क्र. २ व ३ यांचा देखील तिरस्कार करत असे व त्यांना हिनतेची वागणूक देत असे. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा तळोदा येथे राहावयास आला. त्यानंतर गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी माहेराहून रक्कम रू. ५,००,०००/- आणण्याकरीता अर्जदार क्र. १ हिच्या सोबत भांडण केली. तसेच, गैरअर्जदार क्र. १ यास अर्जदार क्र. १ हिला मारण्यास देखील सांगितले. तेव्हा

अर्जदार क्र. १ हिच्या आईने वाद मिटविला. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ याने दि. १९.०५.२०२१ रोजी दारू पिऊन येऊन रात्री ०२.३० वाजता अर्जदार क्र. १ हिला मारहाण करून घराबाहेर काढले. तिने कशी बशी रात्र काढली परंतु, गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिला दहा ते बारा लाख रूपये आणले नाही तोपर्यंत घरी येऊ नको असे म्हणून सर्व अर्जदारांना घराबाहेर काढले. त्यानंतर पंचासमक्ष बैठक बसली परंतु, त्याचा काही एक फायदा झाला नाही.

०४. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार यांनी हकलून दिल्यापासून अर्जदार क्र. १ ते ३ हे अर्जदार क्र. १ हिच्या माहेरी राहतात. परंतु, तिच्या माहेरची परिस्थीती देखील हलाखीची आहे. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. या उलट गैरअर्जदार क्र. १ हा एम. एस. ई. बी. मध्ये नोकरीस आहे. तसेच, त्याला शेती देखील आहे. गैरअर्जदार क्र. १ याला महिनाकाठी रक्कम रू. ७०,०००/– इतके उत्पन्न आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारांना महीना एकत्रितरित्या २०,०००/– पोटगी सहज देऊ शकतो.

०५. गैरअर्जदारांना या प्रकरणाची नोटीस काढली होती. परंतु, गैरअर्जदार हे वकीलांमार्फत हजर झाले नाही. गैरअर्जदार क्र. १ हा न्यायालयासमक्ष हजर झाला होता. परंतु, त्याने त्याच्यामार्फत कोणत्याही विधिज्ञांची नेमणूक केली नाही. तसेच, त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रकरण विना म्हणणे चालविण्यात आले.

०६. अर्जदारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०७. अर्जदार यांनी सादर केलेल्या कथनावरुन व कागदपत्रावरुन मी खालील मुद्दे माझ्या विचारासाठी घेतले आहे व त्यापुढे मी निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेलया कारंणाकरीता मांडत आहे.

| अं.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | गैरअर्जदारांनी अर्जदारावर घरगुती हिंसाचार केला व भविष्यात देखील घरगुती हिंसाचार करण्याची शक्यता आहे हे अर्जदाराने सिध्द केले काय ? | होय. |
| ०२. | अर्जदार हे स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहेत हे सिध्द केले काय ? | होय. |
| ०३. | गैरअर्जदार हे अर्जदारांचे पालनपोषण करण्यास समर्थ आहे व त्याच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे हे सिध्द झाले काय ? | होय. |
| ०४. | अर्जदार प्रार्थनेप्रमाणे कलम १७, १८, १९, २० व २२ अंतर्गत न्याय मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ०५. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे . |

**कारणमिमांसा**

०८. अर्जदारांनी आपल्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांच्या अर्जाच्या पुष्ठयर्थ तोंडी पुरावा म्हणून अर्जदार क्र. १ चा पुरावा प्रतिज्ञालेख नि.क्रं.०६ वर दाखल केले आहे. अर्जदार क्र. ०१ हिला संधी देऊनही त्यांनी इतर साक्षीदार तपासले नाही. करीता

निशाणी क्र. १ खाली दि. १३.०१.२०२६ रोजी आदेश पारित करून त्यांचा पुरावा बंद करण्यात आला.

०९. त्याचप्रमाणे गैरअर्जदारांनी त्यांच्या वतीने संधी देऊनही कोणताही तोंडी वा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे नि.क्र. १ खाली दि. ०४.०३.२०२६ रोजी आदेश पारीत करून त्यांचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्रं.१ बाबत–</u>**

१०. महिलांचे कौटुंबीक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ च्या कलम ३ मध्ये घरगुती हिंसाचाराबाबत सांगितले आहे. या कलमान्वये कौटुंबीक हिंसाचाराची व्याख्या स्पष्ट केली आहे. त्यामध्ये, पतीने किंवा उत्तरवादीने केलेले कोणतेही कृत्य, लोप पावलेले कृत्य किंवा कृती किंवा वागणुक ज्यावेळेस हिंसाचार म्हणुन स्पष्ट होईल अशा वेळी पुढील गोष्टीचा समावेश हिंसाचार म्हणून ठरविला गेला आहे– आरोग्यास, सुरक्षीततेस, जीवीतास किंवा स्वास्थ्यास, मानसिक किंवा शारीरिक दुखापती, लैंगीक गैरवर्तन, अवयवांना दुखापत, शाब्दीक, भावनिक आणि आर्थिक गैरवर्तन या गोष्टीचा समावेश केला आहे. त्याचप्रमाणे त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे, व्यथित व्यक्तीचा जीव धोक्यात आणण्यात भाग पाडणे. तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडून हुंडयाची किंवा इतर मालमत्ता किंवा मौल्यवान गोष्टी संपादण्यासाठी तिला भाग पाडणे, शारिरीक किंवा मानसिक दुखापतीला कारणीभुत होणे, महिलेला मानसीक व शारिरीकरित्या इजा पोहचविणे, तिला अथवा तिच्या माहेरच्या व्यक्तीला टाकुन बोलणे,

अवमानीत करणे, त्यांना हुंडयाची मागणी करणे, पिडीत महिलेचा भावनिक छळ करणे, तसेच तिला आर्थिक सहाय्य न करणे, तिला घरगुती अधिकारापासून वंचीत ठेवणे या अन्य प्रकारच्या घटकांचा घरगुती हिंसाचारामध्ये समावेश होतो. सदर प्रकरणात अर्जदाराचा पिडीत महिला म्हणुन झालेल्या छळाचा उपरोक्त नमुद घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येत समावेश होतो किंवा नाही हे बघणे गरजेचे आहे.

११. अर्जदार क्र. ०१ हिने तिच्या अर्जाच्या कथनानुसार न्यायालयासमक्ष शपथपत्रावर साक्ष नोंदविली व सांगितले की, अर्जदार क्र. ०१ ही गैरअर्जदार क्रं.१ ची लग्नाची कायदेशीर पत्नी आहे. गैरअर्जदार क्रं.२ हे अर्जदाराचे सासरे, गैरअर्जदार क्र. ३ हि अर्जदाराची सासू व गैरअर्जदार क्र. ४ हे दिर आहेत. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दि. २७.०५.२०११ रोजी मोड, ता. तळोदा येथे संपन्न झाला. लग्नानंतर अर्जदार क्र. ०१ हि गैरअर्जदार क्र. १ सोबत तो नोकरी करत असलेल्या ठिकाणी म्हणजे सातारा, वळसा, सोलापूर येथे नांदावयास गेली. सुरूवातीचे काही दिवस अर्जदार क्र. ०१ हिला चांगली वागणूक देण्यात आली. त्यांना लग्न संबंधातून मुलगा दिपराज व मुलगी दिव्या जन्मास आले. गैरअर्जदार क्र. १ हा महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मध्ये ऑपरेटर म्हणून नोकरीस आहे. सन २०१४ मध्ये त्यांची बदली तळोदा येथे झाली. त्यामुळे अर्जदारांचा गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांच्यासोबत मोड या गावी राहण्याचा प्रसंग आला. तेव्हा पासून गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे अर्जदारास शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास देत होते. ते अर्जदार क्र. १ हिला ड्रेस घालायचा

नाही असे बंधन लावत असे. तसेच, अनेक प्रकारचे आरोप गैरअर्जदार हे तिच्यावर लावत असे. गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे अर्जदार क्र. १ हिला ''तु इथे कशाला आलीस तु तिकडेच बरी होती'' असे म्हणत होते. तसेच, लग्नामध्ये मनाप्रमाणे वस्तु भेटल्या नाहीत असे बोलून दाखवत असे. गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे गैरअर्जदार क्र. १ याला भरवून देत असे. त्यामुळे तो अर्जदार क्र. १ हिच्यासोबत भांडण करत असे. परंतु, सुखी संसाराच्या आशेने अर्जदार क्र. १ हिने सर्व सहन केले.

१२. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार हे अर्जदार क्र. २ व ३ यांचा देखील तिरस्कार करत असे व त्यांना हिनतेची वागणूक देत असे. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा तळोदा येथे राहावयास आला. त्यानंतर गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी माहेराहून रक्कम रू. ५,००,०००/– आणण्याकरीता अर्जदार क्र. १ हिच्या सोबत भांडण केली. तसेच, गैरअर्जदार क्र. १ यास अर्जदार क्र. १ हिला मारण्यास देखील सांगितले. तेव्हा अर्जदार क्र. १ हिच्या आईने वाद मिटविला. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ याने दि. १९.०५.२०21 रोजी दारू पिऊन येऊन रात्री ०२.३० वाजता अर्जदार क्र. १ हिला मारहाण करून घराबाहेर काढले. तिने कशी बशी रात्र काढली परंतु, गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिला दहा ते बारा लाख रूपये आणले नाही तोपर्यंत घरी येऊ नको असे म्हणून सर्व अर्जंदारांना घराबाहेर काढले. त्यानंतर पंचासमक्ष बैठक बसली परंतु, त्याचा काही एक फायदा झाला नाही.

१३. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार यांनी हकलून दिल्यापासून अर्जदार क्र. १ ते ३ हे अर्जदार क्र. १ हिच्या माहेरी राहतात. परंतु, तिच्या माहेरची परिस्थीती देखील हालाखीची आहे. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. या उलट गैरअर्जदार क्र. १ हा एम. एस. ई. बी. मध्ये नोकरीस आहे. तसेच, त्याला शेती देखील आहे. गैरअर्जदार क्र. १ याला महिनाकाठी रक्कम रू. ७०,०००/– इतके उत्पन्न आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारास महीना एकत्रितरित्या २०,०००/– पोटगी सहज देऊ शकतो.

१४. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. ०१ चा उलटतपास घेतला नाही. तसेच गैरअर्जदारांनी त्यांचे म्हणणे अभिलेखावरती दाखल केले नाही. त्यांनी त्यांच्या समर्थनार्थ कोणताही पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे अर्जदारांनी दाखल केलेल्या पुराव्याला कोणतेही आव्हाण गैरअर्जदारांतर्फे भेटले नाहीत.

१५. अर्जदारांच्या कथनावरुन असे दिसुन येते की, अर्जदार हे सध्या अर्जदार क्र. १ च्या माहेरी राहत आहेत. अर्जदार क्र. ०१ हि गैरअर्जदारांकडे लग्नानंतर काही वर्षापर्यंत राहिली होती. परंतु गैरअर्जदारांच्या त्रासामुळे तिला माहेरी राहण्याशिवाय पर्याय राहिला नाही. इथे ही गोष्ट नमुद करणे महत्वाचे ठरते की, भारतीय विवाहीत स्त्री कितीही असुशिक्षीत असली तरही काहीही कारण नसतांना आपल्या पतीचे घर सोडण्याचा विचार करु शकत नाही. परंतु ज्या वेळेस तिला होणारा छळ अगदी असहय होतो त्यावेळी विवाहीत स्त्री अशा प्रकारे पावले उचलते. या पाशर्वभुमीवर सदर

प्रकरणातील एकंदरीत वस्तुस्थिती लक्षात घेता अर्जदाराला देखील गैरअर्जदाराकडून शारिरीक व मानसीक छळ होत असावा असे मानता येईल.

१६. त्यामुळे गैरअर्जदार हे अर्जदारावर घरगुती हिंसाचार करतात व भविष्यात देखील घरगुती हिंसाचार करण्याची शक्यता आहे हे अर्जदाराने सकृतदर्शनी सिध्द केले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्रं.१ चे उत्तर 'होकारार्थी' दिले आहे.

**<u>मुद्दा क्रं.२ व ३ बाबत–</u>**

१७. अर्जदार हे अर्जदार क्र. १ च्या माहेरी राहत असल्यापासून गैरअर्जदारांनी कधीही त्यांची विचारपुस केली नाही, त्यांचे पालनपोषण करण्यासाठी मदत केली नाही व त्यांचे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे. अशा परिस्थितीत पुरेशी ऐपत असताना सुध्दा त्यांनी अर्जदारांची उपेक्षा करुन त्यांचा उदरनिर्वाह करण्यास नकार दिला आहे. त्याचबरोबर ही गोष्ट मान्य करावी लागेल की, अर्जदार क्र. ०१ ही स्त्री असल्याने ती तिच्या उदरनिर्वाहासाठी पुर्णपणे गैरअर्जदारांवर अवलंबुन आहे. त्यामुळे अर्जदार हे गैरअर्जदारांकडून पोटगी मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी मुद्दा क्रं.२ च ३ चे उत्तर 'होकारार्थी' दिले आहे.

**<u>मुद्दा क्रं.४ बाबत–</u>**

१८. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून सरंक्षण कायदा, २००५ अंर्तगत संरक्षणात्मक आदेश मिळण्याकरीता घरगुती नातेसंबंध व घरगुती हिसांचार झाल्याचे अर्जदारांनी शाबीत करावे लागते. सदर बाब अर्जदारांनी शाबीत केलेली आहे. घरगुती

हिंसाचाराची पुनरावृतती होण्याची शक्यता नाकारत येत नाही. त्यामुळे मनाई आदेशाच्या स्वरुपात संरक्षणात्क आदेश अर्जदारांच्या बाजुने पारित करणे आवश्यक आहे. वर नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार हे अर्जदारांवर घरगुती हिंसाचार करतात व भविष्यात देखील घरगुती हिंसाचार करण्याची शक्यता आहे हे अर्जदारांनी सकृतदर्शनी सिध्द केले आहे. त्यामुळे अर्जदार हे महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, २००५ च्या कलम १८ अंतर्गत न्याय मिळण्यास पात्र आहेत.

१९. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, ते अर्जदार क्र. १ हिच्या माहेरी राहत आहेत आणि तसा त्यांनी तोंडी पुरावाही दिलेला आहे. तसेच त्यांनी कलम १७ प्रमाणे गैरअर्जदारांच्या घरी कायमचा राहण्याचा हक्क व अधिकार देण्यात यावा अशी विनंती केली आहे. परंतु त्यांनी गैरअर्जदाराला घर असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावरती दाखल केलेला नाही. त्यामुळे ते सदर मागणीस पात्र नाहीत. परंतु ते सध्या गैरअर्जदारांपासुन वेगळे राहतात. त्यामुळे त्यांना वेगळे निवासस्थानाची तरतुद करणे आवश्यक आहे. म्हणुन त्यांना वेगळया निवासस्थानाच्या भाड्यापोटी काही रक्कम देणे क्रमप्राप्त ठरते.

२०. अर्जदारांनी त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रात अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदारांनी केलेल्या कौटुंबीक हिसांचारामुळे तिला भावनीक, मानसीक त्रास दिला व तिचे ईजा होऊन नुकसान झाले असे पुर्ण विवरण दिलेले नाही. त्याचप्रमाणे नुकसान झाल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

केवळ मोघमपणे अर्जदारांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात सांगितले आहे की, तिला शारिरीक व मानसिक छळ केल्यामुळे दहा लाख रूपये नुकसान भरपाई द्यावी. अशा परिस्थितीत हे न्यायालय नुकसान भरपाईची दहा लाख रुपयाची मागणी मान्य करु शकत नाही. परंतु अर्जदारांच्या पुराव्यावरुन हे सिध्द झाले आहे की, गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. ०१ हिचा मानसीक व शारिरीक छळ केलेला आहे आणि त्या छळापोटी तिला काहीना काही रक्कम नुकसान भरपाई म्हणून देणे क्रमप्राप्त ठरते. म्हणुन अर्जदारांना नुकसान भरपाई पोटी रुपये २०,०००/– देणे योग्य राहिल.

२१. अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ चे वय ३८ वर्ष आहे. त्याला कुठलाही शारिरीक व मानसीक, गंभीर व्याधी असल्याने कुठलेच कारण नाही. म्हणजेच तो शरीराने देखील सदृढ आहे. त्यामुळे तो अर्जदारांना पोटगी देऊ शकतो. त्याचबरोबर गैरअर्जदार क्रं.१ हा अर्जदारांना पोटगी देण्यास जबाबदार असल्यामुळे त्याने त्यांना किती पोटगी दयावी ही बाब तपासावी लागेल. अर्जदारांनी गैरअर्जदाराचे उत्पन्न सिध्द करण्यासाठी तोंडी पुरावा दिलेला आहे. अर्जदारांच्या साक्षीनुसार गैरअर्जदार क्र. १ हा एम एस ई बी मध्ये ऑपरेटर म्हणून काम करतो व त्यातुन त्याला दर महा रक्कम रू.७०,०००/–इतका पगार मिळतो. तसेच त्याला शेत जमिन असून त्यातुन देखील त्याला उत्पन्न मिळते परंतु अर्जदारांनी गैरअर्जदारांच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. गैरअर्जदार क्र. १ हा नोकरीस आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा अर्जदार अभिलेखावर दाखल करू शकली असती. परंतु,

त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. तसेच, त्यांनी गैरअर्जदारास शेत असल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. अशा परिस्थीतीमध्ये अर्जदारांच्या म्हणण्यात तथ्य दिसून येत नाही. परंतु गैरअर्जदार क्र. १ हा शरिराने सदृढ असल्याने तो कामधंदा करून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करू शकतो. किंबहूना कुटूंबाचा उदरनिर्वाह करणे ही त्याची जिम्मेदारी आहे. गैरअर्जदाराने कामधंदा केला तर तो महिण्याकाठी पंधरा हजार सहज कमवू शकतो. म्हणून मी गैरअर्जदार क्र. १ चे उत्पन्न दरमहा पंधरा हजार गृहीत धरीत आहे. त्यापैकी १/३ रक्कम ही गैरअर्जदाराच्या स्वखर्चासाठी काढुन ठेवल्यास रुपये दहा हजार एवढी रक्कम पोटगी निर्धारणासाठी विचारात घेता येईल. त्याचप्रमाणे पोटगी रक्कम ठरवितांना दोन्ही पक्षकारांची जीवनशैली तसेच सध्याची महागाई, जीवनावश्यक वस्तुंचे वाढते दर या सर्व बाबींचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करता अर्जदार क्र. १ हीला दरमहा रूपये ३,०००/– पोटगी आणि अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकि रूपये २,०००/– दरमहा दिल्यास न्यायासंगत होईल असा मी निष्कर्ष देत आहे. अर्जदाराला घरभाडयापोटी रक्कम रुपये १,०००/– प्रतिमहिना देणे न्यायसंगत ठरेल. त्यामुळे मी मुद्दा क्र. ४ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत आहे.

<u>**मुद्दा क्रं.५ बाबत–**</u>

२२. वरील सर्व बाबींचा विचार करता मुद्दा क्रं.५ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो. |
| २. | गैरअर्जदारांनी अर्जदारांविरुद्ध कोणत्याही प्रकारचे घरगुती हिंसाचार कृत्ये कोणत्याही माध्यामातुन अगर तर्फे करु नये अशी मनाई करण्यात येते. |
| ३. | गैरअर्जदार क्र. १ ने अर्ज तारखेपासून अर्जदार क्र. १ ला दरमहा रक्कम रुपये ३०००/- व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकि दरमहा रक्कम रूपये २,०००/- इतकी रक्कम पोटगी म्हणुन दयावी. |
| ४. | गैरअर्जदार क्र. १ ने अर्ज तारखेपासून अर्जदारांना दरमहा रु. १,०००/- इतकी रक्कम घरभाड्यापोटी म्हणुन दयावी. |
| ५. | गैरअर्जदारांनी हया अर्जाचा खर्च म्हणुन रक्कम रुपये २,०००/- अर्जदारांना दयावी. |
| ६. | गैरअर्जदारांनी नुकसानभरपाई म्हणुन रक्कम रुपये २०,०००/- अर्जदारांना दयावी. |
| ७. | सदर न्याय निर्णयाची प्रत उभय पक्षकारास मोफत देण्यात यावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला) |

MANE DINESH DAGADU
Digitally signed by MANE DINESH DAGADU
Date: 2026.03.23 11:00:53 +0530

दिनांक- १८.०३.२०२६

**( डी.डी. माने )**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तळोदा .

**<u>प्रमाणपत्र</u>**

अभिकथन करते की, प्रस्तुत पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर शब्द न शब्द मूळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | स्नेहा डी. जैन. |
| न्यायालयाचे नांव | :– | डी. डी. माने साहेब,<br>सह दिवाणी न्यायालय  क. स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, तळोदा |
| निकालाचा दिनांक | :– | १८.०३.२०२६ |
| पिठासीन आधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक – | :– | १८.०३.२०२६ |
| आदेश अपलोड केलेचा दिनांक | :– | २३.०३.२०२६ |

<u>Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app “**eCourts Services**” from Android or iOS</u>

***